# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## नियामक मंडळाची २३ वी बैठक दि.०३.०१.२००१

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची २३ वी बैठक दि.०३.०१.२००१ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. २३/१

''ठराव करण्यात येतो की, २२ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. २३/२

'' ठराव करण्यात येतो की, मंत्रीमंडळाच्या दि.१५.११.२००० रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्यास, तसेच महामंडळाच्या कार्यपद्धतीमध्ये त्यानुसार आवश्यक तो बदल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.२३/३

''ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.३ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा परवाने मिळण्याबाबतच्या एका योजनेच्या प्रस्तावास, 'सदर प्रस्तावाचा पाणी वापर संबंधित प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनामध्ये समाविष्ट केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम पाणी वापर करणारी संस्था महामंडळाकडे भरेल व १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो संतुलन साठा (Balancing Storage) स्वखर्चाने करील, तसेच या मागणीमुळे होणाऱ्या पाणी कपातीसाठी, संबंधित प्रकल्पाची प्रमाणात किंमत (proportional cost of Project) सदर संस्था महामंडळाकडे भरील' या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २३/४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील ज्या विविध बाबींमध्ये विस्तृत सल्लयाची/शिफारशींची (wider consideration) गरज आहे अशाच बाबींसंदर्भात कार्यकारी समितीने निर्णय घ्यावा अथवा शिफारस करावी. कार्यकारी समितीच्या कक्षेच्या विषयांची यादी आवश्यक तितकीच व संक्षिप्त असावी. ही यादी पुढील बैठकीत मंजुरीसाठी सादर करावी.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 23.doc

ठराव क्र. २३/५

''ठराव करण्यात येतो की,

१. बारामती येथील नीरा डावा कालव्यालगतच्या सिटी सर्व्हे नं. २११८ मधील ६०X१८ मी. एवढी जमीन, 'विद्या प्रतिष्ठान बारामती' या संस्थेस वार्षिक भाडेपट्टयाने ३० वर्षाच्या मुदतीसाठी देण्याचा सर्वंकष प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

२. महामंडळाकडील अतिरिक्त जमिनी भाडेपट्टयाने वा दीर्घ मुदतीने देण्याबाबतचे सर्व प्रस्ताव यापुढे शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावेत.''

ठराव क्र.२३/६

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अधिनियम १९९६ च्या सुधारित कलम ४(३) व ४(४) नुसार अशासकीय उपाध्यक्ष/सदस्य व शासकीय सदस्यांना सवलती, पारिश्रमिक व बैठकीसाठी उपस्थित राहण्यासाठी पूरक भत्ते दि.०१.०१.२००१ पासून शासन निर्णय क्र. शासाउ/१०९७/प्रक्र१२/९७/सा.क्र. दि.१.१२.२००० नुसार मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २३/७

''ठराव करण्यात येतो की, कंत्राटदारांच्या प्रोत्साहनाने लीड अरेंजर्सतर्फे प्राप्त झालेल्या कर्जरोखे गुंतवणूकीच्या प्रस्तावाचा अभ्यास वित्त, विभागामार्फत करण्यात येऊन शासनातर्फे आदेश निर्गमित झाल्यानंतर महामंडळाने पुढील कार्यवाही करावी.''

ठराव क्र.२३/८

''ठराव करण्यात येतो की, महामंडळ स्थापन झाल्यापासून महामंडळाच्या वित्त व लेखा शाखेकडील कामात दरवर्षी झालेली वाढ तसेच वित्त व लेखाविषयक कामकाजासाठी सुरुवातीपासूनच अपुरा असलेला अधिकारी व कर्मचारी वृंद लक्षात घेऊन ८ पदांसाठी, पदे शासनास समर्पित करण्याच्या अटींवर खालीलप्रमाणे ८ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.''

निर्माण करावयाची पदे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सहसंचालक (वित्त व लेखा) | - | १ पद |
| २. | उप संचालक (वित्त व लेखा) | - | १ पद |

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 23.doc

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | वरिष्ठ लेखा अधिकारी (वर्ग-१) | - | २ पदे |
| ४. | लेखा अधिकारी (वर्ग-२) | - | २ पदे |
| ५. | सहाय्यक लेखा अधिकारी (वर्ग-३) | - | २ पदे |
| | एकूण | - | ८ पदे |

ठराव क्र. २३/९

''ठराव करण्यात येतो की, कार्यालयीन व आकस्मित खर्चासाठी, शासनामार्फत प्रसृत केलेल्या निर्णयाच्या धर्तीवर तयार केलेल्या, महामंडळाच्या वेगवेगळ्या स्तरांवरील अधिकाऱ्यांस प्रदान करावयाच्या वित्तीय अधिकार व अटींच्या परिशिष्ट क्र.७ मध्ये दर्शविलेल्या प्रस्तावास, नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २३/१०

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या विविध उत्पन्नाच्या बाबींमधून प्राप्त होणाऱ्या निधींचा आणि गुंतवणूकीवरील व्याजाचा विनियोग महामंडळाने उभारलेल्या कर्जरोख्यांवरील व्याज प्रदानासाठी किंवा महामंडळाने अल्पमुदतीकरिता घेतलेल्या कर्जावरील/ठेवींवरील व्याज प्रदानासाठी करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच महामंडळामार्फत केल्या जाणाऱ्या गुंतवणूकींचा दर, ज्या दराने कर्ज उभारले आहे, त्या दरापेक्षा कमी असू नये.''

ठराव क्र.२३/११

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ मधील कलम क्र. ३०(४) अंतर्गत तरतुदींनुसार दैनंदिन कार्यालयीन खर्चासाठी महामंडळाचे चालू खात्यामध्ये (current account) किमान एकूण रु.१० लक्ष इतकी रक्कम दैनंदिन खर्चासाठी ठेवण्यास व उर्वरित निधीची शासन मान्य पद्धतीनुसार, ज्या दराने कर्ज उभारले आहे, त्या दरापेक्षा कमी नसलेल्या दराने, गुंतवणूक करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 23.doc